# महाराष्ट्र विधानसभा

**दिवसाच्या कामकाजाचा क्रम**
**मंगळवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३**

**( सकाळी ११.०० वाजता )**

**एक** : **प्रश्नोत्तरे.**

(अ) **तारांकित प्रश्न.**

(ब) **तारांकित प्रश्नाबाबतची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**मुख्यमंत्री** : "राज्य परिवहन महामंडळातील निवृत्त कर्मचारी व त्यांच्या वारसांना मागील १० वर्षापासून निवृत्ती वेतन मिळाले नसल्याबाबत" या विषयावरील श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर व इतर वि.स.स. यांचा दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजी उत्तरीत झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक ३३३८७ च्या अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**दोन** : **कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**(१) उद्योग मंत्री** : कोंकण विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा एकावन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(२) कृषि मंत्री** : (क) महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ख) वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा पन्नासावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

अप्रमाणित प्रत

**तीन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना — (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये)**

**चार : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

(१) **सर्वश्री अतुल भातखळकर, छगन भुजबळ, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. धनंजय मुंडे, अजित पवार, जयंत पाटील, दिलीप वळसे-पाटील, संजय बनसोडे, दत्तात्रय भरणे, चेतन तुपे, दौलत दरोडा, सुनिल प्रभू, अनिल पाटील, अबू आजमी, भास्कर जाधव, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, अस्लम शेख, ॲड यशोमती ठाकूर (सोनावणे), श्री.सुभाष धोटे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"रत्नागिरी जिल्ह्यातील पत्रकार शशिकांत वारीसे यांच्या दुचाकीला धडक लागून अपघातामध्ये त्यांचा मृत्यू झाल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये निदर्शनास येणे, त्यामध्ये, रिफायनरी समर्थकाने वारिसेंची दुचाकी उडवून जीव घेतल्याचा आरोप होत असणे, पत्रकार वारीसे यांच्या हत्येचा कट हा पूर्वनियोजित असल्याचा संशय निर्माण होत असणे, त्यामुळे, या संपूर्ण प्रकरणाची एसआयटी मार्फत चौकशी करून दोषींवर कडक कारवाई तसेच, पत्रकार वारीसे यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **सर्वश्री. अशोकराव चव्हाण, जितेश अंतापूरकर, माधवराव पवार, मोहनराव हंबर्डे, बाळासाहेब थोरात, राजेश एकडे, प्रा.वर्षा गायकवाड, श्री.संजय जगताप, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"१९६८ च्या मुळ आराखड्यानुसार उर्ध्व पैनगंगा प्रकल्पाअंतर्गत पैनगंगा नदीवर ईसापूर धरण व कयाधू नदीवर सापळी धरण प्रस्तावित असणे, मुळ मंजुरीनुसार उर्ध्व पैनगंगा प्रकल्पाच्या (इसापूर व सापळी) धरणाच्या पाण्यातून नांदेड, हिंगोली, यवतमाळ जिल्ह्याकरिता अंदाजे १,२५,१२६ हेक्टर सिंचन क्षेत्र प्रस्तावित असणे, ईसापूर धरणाचे काम १९८२ या वर्षी पुर्ण होऊनही सापळी धरणाचे काम अद्याप सुरु झालेले नसणे, सन २००८ च्या समरुपता अभ्यासानुसार उर्ध्व बाजूस पाण्याचा वापर वाढवल्यामुळे व उपलब्ध सेवा कमी झाल्यामुळे सिंचन क्षेत्र १,२५,१२६ हेक्टर वरुन १,०७,०९० हेक्टर पर्यंत सिमित करण्यात आलेले असणे, तरीही वाशिम व हिंगोली जिल्ह्यासाठी १०५.१३ दलघमी पाणी ईसापूर धरणाच्या येव्यातून उपलब्ध करुन दिलेले असणे, सन १९८२ ते २०१७ या दरम्यान ईसापूर धरणात फक्त ३८२ दलघमी येवढाच येवा असल्याने धरणात ५८२ दलघमीची तूट असणे, सापळी धरण न झाल्यामुळे उर्ध्व पैनगंगा प्रकल्पाची एकूण तूट ७८१ दलघमी

अग्रिम प्रत

असणे, परिणामत: सापळी धरण वगळून ईसापूर धरणातील पाण्याचा विचार केल्यास केवळ ३१३९६ हे (३९%) क्षेत्र सिंचित होण्याची शक्यता असणे, प्रस्तावित समरूपता अभ्यासानुसार उर्ध्व पैनगंगा प्रकल्पाची विश्वासर्हता ७५% वरुन ३०% आल्याचे दिसून येणे, आज पर्यंत ईसापूर धरण व वितरण व्यवस्थेच्या कामावर सुमारे रु.३२५० कोटी इतका खर्च झाला असून सिंचन क्षमता १,०७,०९० हे. झाली असणे, दिनांक १३ मार्च, २०१९ च्या पत्राने शासनाने टप्पा-२ अंतर्गत भाग-१ मधील १०९ दलघमी पाणी कयाधु खोऱ्यातून ईसापूर धरणात प्रवाही पध्दतीने वळविण्यासाठी प्रस्तावित कामांना तत्वत: मान्यता देणे, तसेच दिनांक १२ नोव्हेंबर, २०२१ च्या पत्राने उपलब्धतेनुसार अनुज्ञेय पाण्यातून अस्तित्वातील धरणाच्या उर्ध्व बाजुस कोणतेही नविन प्रकल्प न घेण्याची सुचना देणे तरीही खरबी वळण योजनेचे पाणी कमी करुन जांभरुन जिल्हा हिंगोली येथील तलावासाठी पाणी उपलब्ध करुन देणे बाबत महामंडळाने दिनांक १९ ऑक्टोबर, २०२२ रोजी अहवाल देणे या परिस्थितीत उर्ध्व पैनगंगा, प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रातून भविष्यात अन्य प्रकल्पासाठी पाणी न देता पुनर्नियोजन व पुनर्विलोकन करण्यासंबंधी प्रस्तावास मान्यता देण्यास लागणारा विलंब, परिणामी स्थानिक जनतेत पसरलेला असंतोष व नाराजीची भावना, त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व राज्य शासनाची प्रतिक्रिया."

(३) **ॲड. आशिष शेलार, ॲड. पराग अळवणी, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. अमित साटम, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, सर्वश्री. किसन कथोरे, प्रशांत ठाकूर, संजय केळकर, बंटी भांगडिया, मंगेश चव्हाण, योगेश सागर, अतुल भातखळकर, मिहीर कोटेचा, पराग शाह, गणपत गायकवाड, कुमार आयलानी, संतोष दानवे, श्रीमती श्वेता महाले, डॉ.भारती लव्हेकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे अन्न व औषध प्रशासन मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"देशातून निर्यात झालेल्या सदोष कफसीरपमधील हानीकारक घटकद्रव्यांमुळे ६६ मुलांचा मृत्यू झाल्याची शक्यता जागतिक आरोग्य संघटनेने निदर्शनास आणून दिल्यानंतरही राज्यात तयार होणाऱ्या विविध प्रकारच्या औषधांच्या गुणवत्ता तपासण्या (स्टॅबिलिटी स्टेट) झाल्यानंतरच जागतिक बाजारपेठेत पाठवणे बंधनकारक असताना राज्यातील २०० औषध उत्पादकांकडून तयार करण्यात येणारी २००० पेक्षा अधिक औषधे कोणत्याही प्रकारच्या स्थिरता चाचणी प्रमाणपत्र न घेताच निर्यात होत असल्याचे फेब्रुवारी, २०२३ मध्ये आढळून येणे, त्यामुळे राज्यातील या २०० औषध उत्पादकांची सखोल चौकशी करून त्यांचे परवाने रद्द करून कारवाई करण्याची आवश्यकता असणे, याकरीता शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

अमुद्रित प्रत

(४) **डॉ.जितेंद्र आव्हाड, सर्वश्री.छगन भुजबळ, रोहित पवार, दत्तात्रय भरणे, शेखर निकम, अबू आजमी, डॉ.बालाजी किणीकर, श्री.संजय जगताप, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात सुमारे १६ हजारपेक्षा जास्त कुष्ठरुग्ण असल्याची गंभीर बाब दिनांक १६ फेब्रुवारी, २०२३ रोजी निदर्शनास येणे, कुष्ठरोग मुक्तीसाठी प्रशासकीय पातळीवर सुरु असलेल्या कार्यवाहीस अपयश येत असल्याने सदरची समस्या अधिकच गंभीर होत असणे, पालघर, चंद्रपूर, नाशिक, जळगाव, ठाणे, गडचिरोली, पुणे यासारख्या जिल्ह्यांमध्ये कुष्ठरुग्णांची संख्या प्रचंड असणे, उत्तर महाराष्ट्रात तीन हजारपेक्षा जास्त, मराठवाड्यात दोन हजारपेक्षा जास्त तर पश्चिम महाराष्ट्रात दीड हजारपेक्षा जास्त कुष्ठरुग्णांची संख्या असणे, हजारो कुष्ठरोगी उपचारांसाठी पुढे येत नसणे, शिंकेतून खोकल्यातून कुष्ठरोगाचे जंतू बाहेर पडले की ते १५ दिवस जिवंत रहात असणे, प्रतिकारशक्ती कमी असलेल्या लोकांना त्यातूनच कुष्ठरोगाची बाधा होत असल्याची चिंताजनक बाब निदर्शनास येणे, हजारो रुग्ण कुष्ठरोग बाधित असल्याची शक्यता विचारात घेता, यासंदर्भात आवश्यक उपाययोजना करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी राज्यातील जनतेत पसरलेला तीव्र असंतोष, कुष्ठरोगी व्यक्ती समाजामध्ये राजरोसपणे वावरत असल्याने अनेक नागरीक बाधित होत असल्याने पसरलेले चिंतेचे वातावरण, त्यांच्या आरोग्यावर घातक परिणाम होत असणे, पुढील काळात ही समस्या आणखी उग्र स्वरुप धारण करणार असल्याने, कुष्ठरोग निर्मुलनासंदर्भात लवकरात लवकर निर्णय घेऊन त्याची त्वरेने अंमलबजावणी करण्यास प्रशासनाचे हेतुपुरस्पर होत असलेले दुर्लक्ष, सदर गंभीर प्रकरणी शासनाने वेळीच हस्तक्षेप करुन तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(५) **सर्वश्री.अबू आजमी, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, अस्लम शेख, सुभाष धोटे, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत यवतमाळ जिल्ह्यातील दोन्ही पाय समान नसलेल्या जिल्हापरिषद व खाजगी (प्राथमिक व माध्यमिक) शाळेतील शालेय विद्यार्थ्यांच्या पायाची तपासणी जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून करण्याबाबतचा निर्णय यवतमाळ जिल्ह्याचे तत्कालिन पालकमंत्री यांनी घेणे, त्यानुसार अधिष्ठाता, श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ यांनी दिनांक २० फेब्रुवारी, २०१९ रोजी शिक्षणाधिकारी माध्यमिक, प्राथमिक, जिल्हापरिषद, नगरपरिषद, यवतमाळ यांना लेखी पत्राव्दारे डॅब्स्टर फुट अँड अँकल प्रा.लि. यांच्याकडून शालेय विद्यार्थ्यांच्या पायाची तपासणी करण्याबाबत निदेश देणे, त्यानुसार शिक्षणाधिकारी (प्राथमिक) शाळा

जिल्हापरिषद, यवतमाळ यांनी मुख्याध्यापक, जिल्हापरिषद व खाजगी (प्राथमिक व माध्यमिक) यांना दिनांक १ मार्च, २०१९ रोजी डॅब्स्टर फुट अँड अँकल प्रा.लि. यांच्या सहकार्याने श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ यांच्यावतीने दिनांक ४ मार्च, २०१९ रोजीपासून जिल्हापरिषद व खाजगी (प्राथमिक व माध्यमिक) नगरपरिषद येथील जवळपास १०० शाळेतील मुलांचे पाय तपासून त्यांच्यावर उपचार करण्यात येणे, परंतु, डॅब्स्टर फुट अँड अँकल प्रा.लि. यांनी संबंधित शाळेतील विद्यार्थ्यांची तपासणी केल्याचा खर्च जवळपास ५० लाखांपेक्षा जास्त असून तो आजमितीपर्यंत संबंधित कंपनीस अदा केलेला नसणे, त्यामुळे संबंधित कंपनीचे लाखोचे नुकसान झाल्यामुळे डॅब्स्टर फुट अँड अँकल प्रा.लि. या कंपनीच्या मालकांवर व कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आलेली असणे, त्यांच्याकडून आत्महत्या करण्याचा होत असलेला प्रयत्न, डॅब्स्टर फुट अँड अँकल प्रा.लि. या कंपनीचे देयक तात्काळ वितरीत करण्याची संबंधितांकडून होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**पाच : राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा (पहिला दिवस).**

**सहा : शासकीय विधेयके :**

**(अ) पुर:स्थापनार्थ :-**

**(१)** सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३ — डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ आणि महाराष्ट्र सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२३.

**(२)** सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ — महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा विधेयक, २०२३.

**(३)** सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५ — महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरण विधेयक, २०२३.

**(ब) विचार, खंडशः विचार व संमत करणे :-**

(१) (क) **सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १ — मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२३**

अमुद्रित प्रत

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.चेतन तुपे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १ – मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३४६ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १ – मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.विजय वडेट्टीवार, अस्लम शेख, सुनिल केदार व ॲड॰ यशोमती ठाकूर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १ – मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ङ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.छगन भुजबळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १ – मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(च) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.सुरेश वरपुडकर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १ – मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती

घेऊन दोन्ही सभागृहांच्या २७ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(छ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.रविंद्र वायकर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १ — मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ज) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.बाळासाहेब थोरात, शिरीषदादा चौधरी, संजय जगताप व नाना पटोले, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १ — मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(२) (क) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ — महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०२३**

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.चेतन तुपे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ — महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३४६ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ — महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

अग्रिम प्रत

**(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.विजय वडेट्टीवार, अस्लम शेख, सुनिल केदार व ॲड॰ यशोमती ठाकूर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ – महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ङ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.छगन भुजबळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ – महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(च) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.सुरेश वरपुडकर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ – महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २७ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(छ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.बाळासाहेब थोरात, शिरीषदादा चौधरी, संजय जगताप व नाना पटोले, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ – महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

अप्रमाणित प्रत

सात : **डॉ. संजय कुटे, सर्वश्री चिमणराव पाटील, रणधीर सावरकर, रमेश बोरनारे, संजय सावकारे, अनिल बाबर, डॉ.प्रा. अशोक उइके, श्री. राजेश पवार, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री तानाजी मुटकुळे, बबनराव लोणीकर, संजय गायकवाड, डॉ. देवराव होळी, सर्वश्री राजेंद्र पाटणी, समीर कुणावार, महेंद्र थोरवे, ॲड आकाश फुंडकर, सर्वश्री सुरेश भोळे, जयकुमार रावल, भरतशेट गोगावले, हरिभाऊ बागडे, प्रशांत बंब, दिलीप बोरसे, योगेश कदम, संतोष दानवे, बबनराव पाचपुते, ॲड. लक्ष्मण पवार, सर्वश्री दिलीप लांडे, संभाजी निलंगेकर-पाटील, श्रीमती श्वेता महाले, सर्वश्री नितेश राणे, गणेश नाईक, अभिमन्यू पवार, ॲड शहाजीबापू पाटील, सर्वश्री महेश शिंदे, प्रकाश आबिटकर, महेंद्र दळवी, विनोद अग्रवाल, राम सातपुते, जयकुमार गोरे, ज्ञानराज चौगुले, सुभाष देशमुख, सर्वश्रीमती मोनिका राजळे, मेघना साकोरे-बोर्डीकर, ॲड राहुल कुल, श्री किसन कथोरे, डॉ. राहुल आहेर, डॉ. संदिप धुर्वे, सर्वश्री हरीष पिंपळे, दादाराव केचे, किर्तीकुमार भांगडीया, कृष्णा खोपडे, विजय रहांगडाळे, कृष्णा गजबे, डॉ. पंकज भोयर, सर्वश्री प्रकाश भारसाखळे, प्रताप अडसड, सर्वश्रीमती देवयानी फरांदे, सीमा हिरे, सर्वश्री काशिराम पावरा, मंगेश चव्हाण, राजेश पाडवी, डॉ. तुषार राठोड, श्री. नारायण कुचे, सर्वश्रीमती मंदा म्हात्रे, मनिषा चौधरी, सर्वश्री प्रशांत ठाकूर, रविशेठ पाटील, महेश बालदी, महेश चौगुले, गणपत गायकवाड, योगेश सागर, राम कदम, सुनिल कांबळे, अतुल भातखळकर, राणा जगजितसिंह पाटील, विजयकुमार देशमुख, सचिन कल्याण-शेट्टी, धनंजय गाडगीळ, समाधान अवताडे, प्रकाश आवाडे, रवि राणा, डॉ. विनय कोरे**, सर्वश्री **रत्नाकर गुट्टे, राजेंद्र राऊत, नामदेव ससाणे, भिमराव केराम, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"मागील सरकारच्या कार्यकाळात, शेतकरी बांधवाच्या समस्यांकडे सातत्याने दुर्लक्ष करण्यात येणे, अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाईपोटी मागील सरकारने एक वर्षात केवळ रु.६००० कोटी वितरित केलेले असतांना महायुती सरकारने रु.१२००० कोटी केवळ ७ महिन्यांच्या कालावधीत वितरीत करून मागील सरकारच्या कार्यकाळात शेतकरी बांधवांवर झालेला अन्याय दूर करणे, अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी मदतीचे निकष महायुती सरकारने दिड पटीने वाढवून शेतकऱ्यांना अगोदरच्या मानकांपेक्षा अतिरिक्त मदत मिळेल याची काळजी घेणे, सत्तेवर येताच मागील सरकारने छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेची अंमलबजावणी थांबविणे व त्याच वेळेस नियमितपणे कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना रु. ५०,०००/- इतके प्रोत्साहन देण्याची घोषणा मागील सरकारने सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या दोन्हीही अर्थसंकल्पीय भाषणात करूनही प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना टाळाटाळ करणे, परंतु शेतकरी हित लक्षात घेवून महायुती सरकारने सत्तेवर येताच शेतकरी बांधवाना प्रोत्साहनपर रु. ५०,०००/- देण्याची प्रक्रिया तात्काळ सुरू करून प्रत्यक्ष मात्र शेतकरी बांधवाच्या खात्यात आजपर्यंत रु.

अग्रिम प्रत

४७०० कोटी जमा करण्यात येणे, विदर्भ, मराठवाडा व खान्देशासह उर्वरीत महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या सिंचनाचा प्रश्न सातत्याने सत्तेवर असूनही आघाडी सरकारने कायमस्वरूपी सोडविण्याचा कधीही प्रयत्न न करणे, परंतू त्याच वेळेस महायुती सरकारने जून २०१९ मध्ये वैनगंगा-नळगंगा नदी जोडप्रकल्प, कोकणात वाहून जाणाऱ्या १८७ अब्ज घनफुट पाणी मराठवाडा व खान्देशात वळविण्याची घोषणा करणे, परंतू मागील सरकारने ३२ महिन्याच्या कार्यकाळात या शेतकरी हिताच्या प्रकल्पांकडे दुर्लक्ष करणे, नव्याने सत्तेवर येताच गत अधिवेशनात विदर्भ व मराठवाड्यासह उर्वरीत महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची सिंचनाची समस्या कायमस्वरूपी सोडविण्यासाठी वैनगंगा-नळगंगा ते पैनगंगा प्रकल्पास मान्यता देणे, कृष्णा-भिमा-मराठवाडा स्थिरीकरण प्रकल्पासही मान्यता देणे, तसेच समुद्रात वाहून जाणारे १८७ टीएमसी पाणी मराठवाडा, खान्देशाकडे वळविण्याच्या प्रकल्पास गती देण्यात येणे, शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी केंद्र शासनाने मंजूर केलेला बळीराजा जलसंजीवनी प्रकल्प मागील सरकारकडून दुर्लक्षित होणे, शेतकऱ्यांसाठी अतिशय महत्वाच्या असणाऱ्या प्रकल्पास महायुती सरकारने सत्तेवर येताच गती देणे, मागील सरकारच्या ३२ महिन्याच्या कार्यकाळात केवळ १४ जलसिंचन प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देणे, परंतू महायुती सरकारने केवळ ६ महिन्याच्या कार्यकाळात २३ जलसिंचन प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देणे, या प्रकल्पांच्या माध्यमातून ५,२१,६५१ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येवून त्याचा फायदा लाखो शेतकऱ्यांना होणे, जलयुक्त शिवार योजनेचा टप्पा २ नव्याने कार्यान्वित करुन शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे विद्यमान शासनाचे प्रयोजन, शेतकरी बांधवांच्या शेतीकरीता दिवसा वीज पुरवठा करण्याची मागणी मागील सरकारकडून सातत्याने दुर्लक्षित होणे, परंतु महायुती सरकारने हा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजनेव्दारे शेती पंपाकरीता दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी तातडीने प्रयत्न सुरू करणे, मागील सरकारच्या कार्यकाळात कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतकऱ्यांना उभे राहण्याची मुभा नसणे, परंतु महायुती सरकारने शेतकऱ्यांना कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये प्रतिनिधित्व मिळावे या उदात्त हेतूने कायद्यामध्ये आवश्यक ते बदल करणे, राज्यात ग्रामीण आरोग्य विभागांतर्गत हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना योजना सुरु करुन जिल्हया-जिल्हयांत आरोग्य सुविधा सहज उपलब्ध करण्याचे विद्यमान शासनाचे धोरण, कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये व्यापाऱ्यांसाठी मोठे गाळे बांधत असतांना शेतकऱ्यांसाठी साधी राहण्याची सोयही वर्षानुवर्ष उपलब्ध नसणे, ही बाब लक्षात घेवून प्रत्येक कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये एक शेतकरी भवन स्थापन करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**आठ : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(१) श्री.अमित साटम, वि.स.स.**

"मुंबई शहरामध्ये म्हाडा अंतर्गत बांधण्यात येणाऱ्या पुनर्विकासित इमारतीतील गाळे वितरणात झालेली अनियमितता" या विषयावरील श्री. अमित साटम, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ५३८०५ ला दिनांक २६ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**(२) ॲड. राहूल कुल, वि.स.स.**

"दौंड तालुक्यांसह (जि.पुणे) राज्यात मोठया प्रमाणात चिबाड शेतजमिनी निर्मुलन करण्यासाठी धोरण ठरविण्याबाबत" या विषयावरील ॲड.राहूल कुल, वि.स.स. यांचा दिनांक २६ डिसेंबर, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक १०५ मधील प्रश्न क्रमांक ४०४१२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

अप्रकाशित प्रत

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २७ फेब्रुवारी, २०२३

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा